गुरुवार दि.२७ मार्च २०२५

हे शब्द आज माझे झाले मुके तरीही !
ते बोलतील भाषा हमखास वादळाची !!
–ॲड.डॉ विजयकुमार कस्तुरे चिखलीकर

जनसामान्य माणसाचे हक्काचे व्यासपीठ

दैनिक लोकनेता बीड

मुख्यसंपादक : ज्ञानेश्वर बुधवत संपादक : ज्ञानेश्वर मुंढे

सुवर्णसंधी...! दैनिक लोकनेता सुवर्णसंधी...!
पत्रकार होण्यासाठी सुवर्ण संधी
दैनिक लोकनेता (जनसामान्य माणसाचे हक्काचे व्यासपीठ)
अल्पावधीतच वाचकांच्या लेखकांच्या पसंतीत उतरलेल्या दैनिक लोकनेता साठी संपूर्ण महाराष्ट्रात जिल्हा, तालुका शहर व गाव पातळीवर प्रतिनिधी नेमणे आहे.अनुभवी व विनाअनुभवी इच्छुकांनी त्वरित संपर्क साधावा !
संपर्क :- संपादक ८४५९९७७९०४

RNI-MAHMAR/2023/89402 Email : elokneta@gmail.com वर्ष : ०२ अंक :१९२ किंमत २ रुपये Lokneta News - लोकनेता न्युज 8459977904 epaper.lokneta.in

# रोहित पवारांनी माझ्यावर हल्ला घडवून आणला: गोपीचंद पडळकर यांचा आरोप

## २०२१ च्या घटनेचा दिला दाखला, पुरावा म्हणून माणूस उभा केला

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**मुंबई (वृत्तसंस्था)**

राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे आमदार रोहित पवार यांनी आपल्यावर हल्ला घडवून आणल्याचा गंभीर आरोप भाजप आमदार तथा धनगर नेते गोपीचंद पडळकर यांनी केला आहे. त्यांनी यासंबंधी पुरावा म्हणून एका व्यक्तीलाही हजर केले. त्याच्या छातीवर शरद पवारांचा फोटो गोंदलेला होता. पडळकर यांच्या या आरोपामुळे राजकारण चांगलेच पेटले आहे.गोपीचंद पडळकर बुधवारी विधान भवन परिसरात पत्रकारांशी बोलताना म्हणाले की, आमदार रोहित पवार यांनी २०२१ मध्ये माझ्यावर हल्ला घडवून आणला. वर्षभरापूर्वी एक व्यक्ती माझ्याकडे आला. त्याने मला सांगितले की, रोहित पवार व सुप्रिया सुळे तुमच्याविरोधात षडयंत्र रचत आहेत. मला धनगरांचा विरोध आहे हे दाखवण्यासाठी धनगर तरुणांना फोडण्याचा प्रयत्न केला जात आहे. देवेंद्र फडणवीस यांनी या प्रकरणाची फेरचौकशी करावी. तसेच संबंधितांना सहआरोपी करावे.विरोधक माझ्या जवळच्या तरुणांना माझ्यावर हल्ला करण्यासाठी फितवण्याचा प्रयत्न करत आहेत. विशेषतः रोहित पवार हे पडळकरांना मारहाण करा, त्यांचे व्हिडिओ सादर करा, त्यांच्याविरोधात पोस्ट करा, धनगर समाजाच्या कार्यक्रमात गोंधळ घाला असे सांगत आहेत. गृहमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी काल रोहित पवारांविषयीचा माहिती पुढे आणली. ते आपल्या आजोबाचा विषय पुढे चालवत आहेत. जयकुमार गोरे प्रकरणात त्यांच्यावर गुन्हे दाखल करून त्यांच्यावर गुन्हे दाखल करा. याशिवाय सोलापुरात माझ्या गाडीवर जो हल्ला झाला होता, त्या प्रकरणी या व्यक्तीचे स्टेटमेंट घेत रोहित पवारांवर गुन्हा दाखल करावा, असे ते म्हणाले.




# चौथीत शिकणार्या मुलीवर २७ वर्षीय नराधमाकडून लैंगिक अत्याचार; वाघोलीतील घटनेनं संताप

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**वाघोली । संतोष कदम**

शाळेत जाण्यासाठी निघालेल्या चौथीतील मुलीवर २७ वर्षांच्या नराधमाने लैंगिक अत्याचार केल्याची घटना वाघोली परिसरात घडली आहे. या प्रकरणातील आरोपीला वाघोली पोलिसांनी अटक केली आहे. या घटनेमुळे वाघोली परिसरात खळबळ उडाली आहे. खाऊच्या आमिषाने नराधमाने चौथीच्या विद्यार्थ्यांनीसोबत घृणास्पद कृत्य केलं आहे. वाघोलीत सोमवारी सकाळी आठ वाजण्याच्या सुमारास केसनंद रोडला हा प्रकार घडला आहे.




पोलिसांनी या प्रकरणी दिलेल्या माहितीनुसार, इयत्ता चौथीमध्ये शिक्षण घेणारी मुलगी सोमवारी सकाळी सात वाजण्याच्या सुमारास घरातून शाळेत जाण्यासाठी निघाली होती. शाळेत जाण्याच्या रस्त्यावर एक पिठाची गिरण आहे, त्या पिठाच्या गिरणीत कामाला असलेल्या २७ वर्षीय आरोपीने तिला अडवलं आणि तुला खाऊ देतो असं आमिष दाखवत आरोपीने पीडित मुलीला पिठाच्या गिरणीत घेऊन गेला आणि त्या ठिकाणी तिच्यावर लैंगिक अत्याचार केला.काही वेळात गिरणीपासून काही अंतरावर पीडित मुलगी रडत होती. ते रस्त्यावरून जाणाऱ्या येणाऱ्या नागरिकांनी पाहिलं. त्यावेळी काही नागरिकांनी मुलीकडे विचारपूस केल्यावर तिने तिच्यासोबत घडलेला प्रकार सांगितला. त्यानंतर नागरिकांनी तात्काळ पोलिसांना याबाबत माहिती दिली. या घटनेची माहिती मिळताच पोलिस घटनास्थळी दाखल झाले. त्यांनी आरोपीला ताब्यात घेऊन त्यांच्याविरोधात गुन्हा दाखल केला. या प्रकरणाचा तपास वाघोली पोलिस करत आहेत.

# मारतळा येथिल व्हि.पि.के.पतसंस्थेचा दुसरा वर्धापनदिन उत्साहात साजरा




■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**मारतळा । भास्कर ढेपे**

मारतळा ता.लोहा जि.नांदेड येथील व्ही.पी.के.पतसंस्था शाखा मारतळा चा दुसरा वर्धापन दिन उत्साहात साजरा करण्यात आला. व्हि.पि.के.पतसंस्था नांदेड जिल्हात ठेवीदार, कर्जदार व खातेदारांच्या विश्वासावर यशस्वीपणे कार्यरत आहे, अशी माहिती सीईओ आण्णाराव पाटील शिंदे यांनी दिली. कार्यक्रमात सल्लागार समितीचे सदस्य, अधिकारी, कर्मचारी, ठेवीदार व कर्जदार यांचा सहभाग होता. प्रारंभी कै. बाबासाहेब गोरठेकर व कै. व्यकटराव पाटील कवळे यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले.यावेळी प्रमुख उपस्थिती दैनिक सकाळ चे बातमीदार गणेश पाटील ढेपे .शाखा व्यवस्थापक जी.बी.कुरे अधिकारी वाय.टी.पुयड ,एन.जे. उबाळे यांच्या उपस्थितीत व्हि.पि.के. पतसंस्थेचा दुसरा वर्धापनदिन सोहळा उत्साहात साजरा करण्यात आला.

## क्षयरोग जनजागृती व मार्गदर्शन कार्यक्रम संपन्न

# गावाच्या क्षयरोग निर्मूलनासाठी सामाजिक सहकार्याची गरज–डॉ. निलेश उके

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**लोणी । प्रतिनिधी**

जागतिक क्षयरोग दिनानिमित्त प्राथमिक आरोग्य केंद्र, लोणी येथे क्षयरोग जनजागृती व मार्गदर्शन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी रमेश काळे होते, तर प्रमुख मार्गदर्शक म्हणून वैद्यकीय अधिकारी डॉ. निलेश उके यांनी उपस्थित राहून क्षयरोगाविषयी सविस्तर माहिती दिली. कार्यक्रमात तालुका स्तरावरील अनेक मान्यवरांनी हजेरी लावली. गावातील नागरिक, महिला बचत गटाच्या सदस्य आणि आरोग्य केंद्रातील सर्व कर्मचारी आशा उपस्थित होते. डॉ. निलेश उके यांनी क्षयरोग हा केवळ संसर्गजन्य आजार नसून समाजातील चुकीच्या समजुतींमुळे आणि व्यसनांमुळे अधिक गंभीर होत



असल्याचे सांगितले. ते म्हणाले, शासन जसे गरोदर माता आणि बालकांच्या आरोग्यासाठी संवेदनशील आणि कृतीशील आहे, तसेच टी.बी. आजारासाठीही आपण गांभीर्याने दखल घेण्याची गरज आहे. टी.बी. निर्मूलनासाठी सामाजिक सहभाग महत्त्वाचा क्षयरोगावर प्रभावी उपचार उपलब्ध असून, हा आजार पूर्णतः बरा होऊ शकतो. मात्र, समाजात या आजाराबद्दल असलेल्या चुकीच्या समजुती आणि सामाजिक ीिळसार (कलंक) यामुळे अनेक रुग्ण योग्य वेळी उपचार घेत नाहीत. त्यामुळे क्षयरोग निर्मूलनासाठी समाजानेही पुढाकार घेणे आवश्यक आहे. आपल्या गावात कोणत्याही कोपऱ्यात लहान बाळांना निवांत फिरता यावे, यासाठी आपले गाव टी.बी. मुक्त करणे आवश्यक आहे, असे प्रतिपादन करत डॉ. उके यांनी क्षयरोग निर्मूलनासाठी प्रत्येकाने जागरूक राहण्याचे आवाहन केले. मान्यवरांचे मार्गदर्शन व संकल्प कार्यक्रमात उपस्थित मान्यवरांनीही आपल्या भावना व्यक्त करत, क्षयरोग निर्मूलनासाठी सर्वांनी एकत्र येण्याची गरज असल्याचे नमूद केले. समाजातील प्रत्येक व्यक्तीने क्षयरोगाविषयी जागरूकता ठेवून लवकर निदान आणि उपचार करण्यासाठी मदत करावी, असे आवाहन करण्यात आले. कार्यक्रमाच्या शेवटी गावातील नागरिकांनी टी.बी. मुक्त गाव करण्याचा संकल्प केला. शपथ घेण्यात आली आरोग्य केंद्राच्या माध्यमातून पुढील काळात क्षयरोग प्रतिबंधक उपाययोजनांवर अधिक भर दिला जाणार असल्याचेही यावेळी सांगण्यात आले.

# ब्राह्मणगाव येथील समीक्षा वाठोरेची जवाहर नवोदय विद्यालय साठी निवड



■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**उमरखेड । सय्यद रहीम राजा**

श्री. तेजमल गांधी कृषी विद्यालय ब्राह्मणगाव येथील कु. समीक्षा सुबोध वाठोरे या विद्यार्थिनीचा इयत्ता सहावी साठी जवाहर नवोदय विद्यालय बेलोरा ता.घाटंजी येथे निवड झाली आहे . त्याबद्दल श्री शिवाजी शिक्षण संस्थेचे अध्यक्ष अनिरुद्ध पाटील चोंढीकर, विद्यालयाचे चेअरमन डॉ . विजयराव माने यांनी तिचे व पालकांचे कौतुक करून शुभेच्छा दिल्या. श्री तेजमल गांधी कृषी विद्यालयात डॉ. माने यांच्या मार्गदर्शनात विविध उपक्रम घेण्यात येत असतात त्यात नाविन्यपूर्ण परीक्षा, इतर उपयोगी उपक्रम, कौशल्य विकास, वृक्षसंवर्धन असे उपक्रम विद्यालयांमध्ये सातत्याने विविध प्रकारचे नवीन तंत्रज्ञानाचा उपयोग करून विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास साधला जातो. कु . समीक्षा सुबोध वाठोरे या विद्यार्थिनींच्या यशाबद्दल श्री तेजमल गांधी कृषी महाविद्यालयाचे मुख्याध्यापक, शिक्षक यांनी तिच्या घरी जाऊन कुटुंबासह तिचा सत्कार केला समीक्षा वाठोरे च्या यशा बद्दल सर्वत्र तिचं कौतुक होत आहे.

# धारजणी येथे अखंड हरिनाम सप्ताह निमित्त संगीत शिव महापुराण कथा ज्ञान यज्ञ व किर्तन महोत्सवाचे आयोजन

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**भोकर । रमाकांत जोशी**

तालुक्यातील मौजे धारजणी येथे दरवर्षीप्रमाणे याही वर्षी दिनांक ३० मार्च २०२५ ते दिनांक ६ एप्रिल २०२५ दरम्यान श्री हनुमान मंदिर परिसरात अखंड हरिनाम सप्ताहाचे आयोजन करण्यात आले असून त्यानिमित्त दुपारी १ ते ४ ह भ प गोविंद महाराज मुंडे परळी वैजनाथ यांच्या ओजस्वी वाणीतून संगीत शिव महापुराण कथा ज्ञान यज्ञांचे आयोजन करण्यात आले आहे तर दररोज रात्री मान्यवर संतांची हरिकीर्तने होणार आहेत.

या हरिनाम सप्ताहातील दैनंदिन कार्यक्रम खालील प्रमाणे असतील.सकाळी ४ ते ६ काकडा भजन व आरती,७ ते ११ श्री ज्ञानेश्वरी ग्रंथाचे पारायण,दुपारी १ ते ४ संगीत शिव महापुराण कथा ज्ञान यज्ञ,सायंकाळी६ ते ७:३० हरिपाठ व रात्री ९ ते ११ खालील मान्यवर संतांची हरिकीर्तने होतील.

दि.३० मार्च रविवार ह भ प परमेश्वर महाराज शहापूरकर,दि.३१ मार्च सोमवार ह भ प वैष्णव दीदी गौड सोनखेडकर,दि.१ एप्रिल मंगळवार हभप भाग्यश्रीताई मोहिते परभणीकर,दि.२ एप्रिल बुधवार ह भ प माधव महाराज वडगावे पांगरीकर,दि.३ एप्रिल गुरुवार हभप गोविंद महाराज मुंडे परळी वैजनाथ,दि.४ एप्रिल शुक्रवार ह भ प तुकाराम महाराज साखरे मंडगीकर,दि.५ एप्रिल शनिवार ह भ प शुभम महाराज लिपणे, दिनांक ६ एप्रिल २०२५ रोज रविवारी सकाळी ९ ते ११ भागवताचार्य ह भ प योगेश महाराज गवंडगावकर यांचे काल्याचे किर्तन होईल व नंतर महाप्रसादाचे वाटप करण्यात येईल.तरी परिसरातील सर्व भाविक भक्तांनी या सर्व धार्मिक कार्यक्रमाचा आवर्जून लाभ घ्यावा असे आवाहन समस्त गावकरी मंडळी मौजे धारजणी ता.भोकर जि.नांदेड यांच्या वतीने करण्यात आले आहे.

# कापूस संशोधन योजनेच्या कीटकनाशक प्रतिकारशक्ती व्यवस्थापन प्रकल्पांतर्गत शेतकरी प्रशिक्षण कार्यक्रम संपन्न

## एकात्मिक कीड व्यवस्थापन तंत्रज्ञानाचा अवलंब करावा–मा.कुलगुरू प्रा.(डॉ) इन्द्रमणि

लोकनेता न्यूज नेटवर्क

**नांदेड । गोविंद पा.मोरे**

वसंतराव नाईक मराठवाडा कृषी विद्यापीठाच्या कापूस संशोधन योजना, परभणी आणि भारतीय कृषी अनुसंधान परिषद – केंद्रीय कापूस संशोधन संस्था, नागपूर यांच्या संयुक्त विद्यमाने 'कीटकनाशक प्रतिकारशक्ती व्यवस्थापन: गुलाबी बोंडअळी व्यवस्थापन तंत्रज्ञान प्रसार प्रकल्प' अंतर्गत शेतकरी प्रशिक्षण कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. हा कार्यक्रम मंगळवारी, २५ मार्च रोजी कापूस संशोधन योजना, परभणी येथे पार पडला.कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी विद्यापीठाचे माननीय कुलगुरू प्रा. (डॉ.) इन्द्र मणि होते. तर विशेष अतिथी म्हणून संशोधन संचालक डॉ. खिजर बेग यांनी उपस्थिती दर्शवली. व्यासपीठावर कापूस संशोधन योजनेचे प्रभारी अधिकारी डॉ. अशोक जाधव, कीटकशास्त्र विभाग प्रमुख डॉ. पुरुषोत्तम नेहरकर, गहू व मका योजनेचे प्रभारी अधिकारी डॉ. उमाटे, कार्यक्रम समन्वयक डॉ. दिंगबर पटाईत आणि प्रगतशील शेतकरी श्री. रत्नाकर ढगे आदी मान्यवर उपस्थित होते.

आपल्या अध्यक्षीय भाषणात माननीय कुलगुरू प्रा. (डॉ.) इन्द्र मणि यांनी कापूस, सोयाबीन व मका या पिकांच्या उत्पादन वाढीबाबत महत्त्वाचे मार्गदर्शन केले. गुलाबी बोंडअळीच्या प्रतिकारशक्ती व्यवस्थापनासाठी केवळ रासायनिक कीटकनाशकांवर अवलंबून न राहता शेतकऱ्यांनी एकात्मिक कीड व्यवस्थापन तंत्रज्ञानाचा अवलंब करावा, असा महत्त्वाचा संदेश त्यांनी दिला. विद्यापीठाने शेतकऱ्यांसाठी सदैव सहकार्याची भूमिका बजावली असून 'शेतकरी देव भव:' हे ब्रीदवाक्य अधोरेखित करत कापसाच्या उत्पादनात वाढ करण्यासाठी विद्यापीठ विशेष संशोधन करणार असल्याचे त्यांनी सांगितले. तसेच प्रगतशील शेतकरी श्री रत्नाकर ढगे यांचा २६ जानेवारीला राष्ट्रपती भवनामध्ये बोलाविण्यात येवून त्यांचा सन्मान करण्यात आला, तो त्यांनी केलेल्या परिश्रमाची ही पावती आहे, त्यामुळे असे अनेक शेतकरी आपल्या मराठवाड्यातून निर्माण झाले पाहिजेत



अशी आशा त्यांनी यावेळी व्यक्त केली.संशोधन संचालक डॉ. खिजर बेग यांनी विद्यापीठाने विकसित केलेल्या 'नांदेड ४४' सारख्या कापूस वाणांच्या यशस्वी प्रयोगांची माहिती दिली. विद्यापीठाने आता सरळ वाणांमध्ये बीटी तंत्रज्ञान विकसित करून शेतकऱ्यांना स्वयंपूर्ण करण्याचे उद्दिष्ट ठेवले आहे. हे नवीन वाण तीन वर्षांपर्यंत पुनर्लागवड करण्यायोग्य असून शेतकऱ्यांचा बियाण्यावरील खर्चही कमी होईल, असे त्यांनी स्पष्ट केले.यावेळी उपस्थित शेतकऱ्यांनी कापसाच्या उत्पादनात झालेल्या वाढीच्या अनुभव मांडले. मागील वर्षी काही शेतकऱ्यांनी १५ क्विंटल प्रति एकर उत्पादन घेतले असून, सर्व शेतकऱ्यांनी या पुढील हंगामात अधिकाधिक उत्पादनाचा निर्धार करावा, असे आवाहन करण्यात आले. कार्यक्रमादरम्यान पाच गावांतील प्रत्येकी १२ अशा एकूण ६० शेतकऱ्यांना विविध निविष्ठांचे वाटप करण्यात आले. यासोबतच कृषी विद्यापीठाच्या 'कृषी दैनंदिनी २०२५' चेदेखील वाटप करण्यात आले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रभारी अधिकारी डॉ. अशोक जाधव यांनी केले. डॉ. डी. डी. पटाईत यांनी कपाशीवरील कीड व्यवस्थापन, डॉ. पी. बी. जाधव यांनी घनपद्धतीने कापूस लागवड, तर डॉ. पी. एस. नेहरकर यांनी कीटकनाशकांच्या संतुलित वापराबाबत शेतकऱ्यांना मार्गदर्शन केले. प्रगतशील शेतकरी श्री. रत्नाकर ढगे यांनी राष्ट्रपती भवनातील त्यांच्या सत्काराचा अनुभव सांगत गटशेतीविषयी माहिती दिली. श्री. पंडित थोरात यांनी प्रकल्पाच्या माध्यमातून त्यांना मिळालेल्या वाढीव उत्पन्नाविषयी माहिती दिली.कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. दिंगबर पटाईत यांनी केले तर आभार प्रदर्शन डॉ. प्रशांत जाधव यांनी केले. कापूस संशोधन योजना, परभणी येथील कृषी सहाय्यक व संशोधन सहकाऱ्यांनी कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी परिश्रम घेतले. परभणी आणि पाथरी तालुक्यातील खानापूर, आर्वी, टाकळगव्हाण, लोणी आणि बाभळगाव येथून ८० हून अधिक शेतकऱ्यांनी या कार्यक्रमाला उत्स्फूर्त प्रतिसाद दिला.

# नगराध्यक्ष व मुख्याधिकाऱ्यांनी केली कोल्हापुरी बंधाऱ्यातील पाण्याची पाहणी

## दोन दिवसात पाणी अडविण्याचे कंत्राटदाराचे आश्वासन

लोकनेता न्यूज नेटवर्क

**माहूर । राजकिरण द. देशमूख**

श्रीक्षेत्र माहूर शहरासह श्री रेणुका माता मंदिरावर पाणीपुरवठा करणाऱ्या पैनगंगा नदी पात्रातील कोल्हापुरी बंधाऱ्यात साठविलेले पाणी वाहून जात असल्याने नगराध्यक्ष फिरोज दोसानी मुख्याधिकारी विवेक कांदे उपनगराध्यक्ष ज्ञानेश्वर लाड कार्यालय अधिक्षक वैजनाथ स्वामी यांचे सह नगरसेवकांनी पैनगंगा नदी पात्रातील कोल्हापुरी बंधाऱ्यावर जाऊन कोल्हापुरी बंधाऱ्याजवळ पाण्याची पाहणी केली.नदीपात्रात सुरू असलेल्या मोठ्या बंधाऱ्याच्या कंत्राटदारांच्या प्रतिनिधींना बोलावून कोल्हापुरी बंधाऱ्यात मातीचा बांध टाकून पाणी अडविण्याचे सांगितल्याने कंत्राटदार प्रतिनिधी यांनी दोन दिवसात संपूर्ण बंधाऱ्यात पाणी अडवून देण्याचे आश्वासन दिले असून



माहूरच्या पाणीपुरवठा प्रति नगरपंचायत सजग असल्याने त्यांचे माहुरकरासह भाविकातून अभिनंदन होत आहे

माहूर शहरासह श्री रेणुका माता मंदिरावर पाणीपुरवठा करणाऱ्या पैनगंगा नदी पात्रातील कोल्हापूर बंधाऱ्यात पंधरा दिवस पुरेल इतकेच पाणी राहिल्याने माहूरकरांची चिंता वाढली होती त्याची तात्काळ दखल घेत नगरपंचायत चे पदाधिकारी आणि अधिकाऱ्यांनी थेट बंधारा गाठून कंत्राटदारांच्या प्रतिनिधींना पाणी आडविण्याचे सूचना दिल्या यावेळी बंधार्यावर पाणीपुरवठा सभापतींचे प्रतिनिधी रणधीर पाटील, बांधकाम सभापती प्रतिनिधी रफीक सौदागर, नगरसेविका प्रतिनिधी ईरफान भाई,अफसर भाई,देविदास सिडाम,अभिय़ता विशाल ढोरे, स्वच्छता विभागाचे गणेश जाधव व ईतर उपस्थित होते.माहूर शहराला पाणीपुरवठा करण्यासाठी एकमेव पैनगंगा नदी पात्रातील कोल्हापुरी बंधारा असून येथे आमदार भीमराव केराम यांच्या माध्यमातून नवीन मोठ्या बंधाऱ्याचे काम शारदा कंट्रक्शन कडून जलद गतीने करण्यात येत असले तरीही बंधाऱ्यातील पाणी त्यांना डायव्हर्ट करून दुसरीकडून काढावे लागले आता मात्र नदी पात्रातील पाण्याची धार कमी झाल्याने कोल्हापुरी बंधाऱ्यात अर्ध्यावरच माती टाकून पाणी थांबविल्याने पाणीसाठा वेगाने कमी होत असल्याने माहूरकरांची चिंता वाढली होती त्यामुळे नगरपंचायत माहूर कडून याप्रकरणी तात्काळ दखल घेत पाहणी केल्याने आता संपूर्ण कोल्हापुरी बंधाऱ्यात पाणी थांबणार असल्याने पाण्याची चिंता मिटणार आहे त्यामुळे माहूरकरासह भाविकातून नगरपंचायत चे पदाधिकारी अधिकाऱ्यांचे अभिनंदन होत आहे.

# राठोडवाडीची आरोही जाधव तिरंदाजी स्पर्धेत देशभरात चमकली

लोकनेता न्यूज नेटवर्क

**मुखेड । शिवकुमार बिरादार**

मुखेड तालुक्यातील राठोडवाडी या छोट्याशा तांड्यातील आरोही शंकर जाधव हिने दि.२१ ते २५ एप्रिल २०२५ दरम्यान गुंटूर आंध्रप्रदेश येथे झालेल्या आर्चरी अंडर १० छद्धझउ नॅशनल स्पर्धेमध्ये आरोहीने आपल्या खेळाचे उत्कृष्ट प्रदर्शन करत. ओव्हर ऑल रँकिंग मध्ये देशात पहिला क्रमांक मिळवला आहे.

वैयक्तिक एलिमिनेशन प्रकारात तिने तमिळनाडू आंध्र प्रदेश, उत्तर प्रदेश, मनिपुर , तेलंगणा, झारखंड इत्यादी राज्यातील मुलींना हरवत तिने महाराष्ट्राला एक सिल्वर मेडल जिंकून दिले. आरोही जाधव ही मागील १ वर्षा पासून अमोल बोरिवले सर यांच्या कडे इंडियन आर्चरी अकादमी नांदेड येथे सराव करत आहे ती तिच्या यशाचे श्रेय आंतरराष्ट्रीय कोच तथा छ्खड कोच अमोल बोरिवले सर यांना देते.



मुखेड तालुक्यातील राठोडवाडी सारख्या छोट्या गावातून आरोही कठोर मेहनत, नियमित सराव यामुळे तिला हे यश मिळाले आहे . आज नांदेड मध्ये शाळा ट्युशन छएएढ याकडे सर्व पालकांचे लक्ष आहे पण खेळामध्ये सुद्धा करियर होऊ शकते हे आरोही जाधव घेणे सिद्ध करून दाखवले. त्यामुळे तिचे सर्व स्तरातून कौतुक होत आहे.

# भुमी अभिलेख कार्यालयाला प्रभारी अधिकाऱ्यांचे ग्रहण

## भुमी अभिलेख कार्यालयत अनेक कामे प्रलंबित अन् रामभरोसे!



लोकनेता न्यूज नेटवर्क

**कंधार । धोंडीबा मुंडे**

कंधार तालुका भूमी अभिलेख कार्यालय हे जुन्या व नव्या दस्त ऐवजांचे प्रमुख कार्यालय म्हणून ओळखले जाते.दररोज या कार्यालयात तालुक्यांतील मोठ्या संख्येने शेतकऱ्यासह इतर नागरिकांची मोठी वर्दळ होत,असून या कार्यालयास कायमस्वरूपी अधिकारी नसल्यामुळे अनेक संचिका प्रलंबित असून,या कार्यालयातील काम म्हणजे रामभरोशे चालल्याचे दिसून येत आहे.

या कार्यालयाच्या प्रमुखाची माहे सप्टेंबर २०२४ रोजी नियमानुसार बदली झाली आहे, या रिक्त पदावर मुदखेड येथील प्रमुखांकडे कंधार भुमी अभिलेख कार्यालयाचा अतिरिक्त पदभार असल्याने येथील कर्मचाऱ्यांवर कुणाचाच अंकुश नसल्यामुळे कार्यालयातील बहुतांश सरकारी बाबू फिल्डवर्कच्या नावाखाली कार्यालयास दांडी मारत असल्याचे दिसून आले,दांडी बहाद्दर कार्मचाऱ्यांमुळे अनेक अर्ज प्रलंबित असून, शेतकऱ्यांचे मोठे प्रमाणात अडचणीत दिसून येत आहे,

या कार्यालयाचा कारभार मुदखेड येथून चालत असल्यामुळे उंटावर बसून शेळ्या हाकण्या सारखीच अवस्था निर्माण झाली आहे,आमदार प्रतापराव पाटील चिखलीकर यांनी एका बैठकीतुन जनतेचे कामे वेळेवर व्हावेत यासाठी अधिकाऱ्यांनी मुख्यालयी राहण्याच्या सूचना करूनही या कडे अधिकारी व कर्मचारी मात्र कानाडोळा करत असल्याचे पाहावयास मिळत आहे.


या अति महत्त्वाच्या कार्यालयाकला कायमस्वरूपी अधिकारी देऊन शेतकऱ्यांची होणारी हेळसांड थांबवावी, आणि प्रलंबित असलेक्या शेतकऱ्यांच्या संचिका निकाली तात्काळ निकाली काढतील काय ? अशी चर्चा ऐकावयास मिळत आहे.

# किरण शिनगीरे यांचा इंटरनॅशनल आयकॉन अवॉर्ड या आंतरराष्ट्रीय पुरस्काराने सन्मान

लोकनेता न्यूज नेटवर्क

**आष्टी । अण्णासाहेब साबळे**

आष्टी तालुक्यातील कडा येथील अमोलक जैन विद्या प्रसारक मंडळाचे गांधी महाविद्यालयाचे मा.जनरल सेक्रेटरी (जी.एस.) किरण भगवानराव शिनगीरे यांचा वॅक बुक ऑफ रेकॉर्ड (थरल) कडून इंटरनॅशनल आयकॉन अवॉर्ड या आंतरराष्ट्रीय पुरस्काराने वॅक बुक ऑफ रेकॉर्डच्या अध्यक्षा डॉक्टर ज्योती दियावर व विजय बजाज यांच्या हस्ते नुकताच सन्मान करण्यात आला.किरण शिनगीरे यांनी सन २०१९ –२० यावर्षी युवकांचे संघटन करून वटणवाडी तालुका आष्टी येथे गांधी महाविद्यालयाचा गावात ७ दिवस कॅम्प घेऊन वृक्षारोपण केले,स्वच्छता मोहीम राबवली.गावाला पाणीपुरवठा करणाऱ्या विहिरीजवळ श्रमदानातून बंधारा तयार केला.पाण्याचे जल व्यवस्थापन कसे करावे? याबाबत तज्ञांकडून गावात युवक व ग्रामस्थांना मार्गदर्शन केले, तसेच जलसंवर्धनासाठी युवकांचे योगदान, ग्रामसमृद्धी मध्ये महिलांचे योगदान,विज्ञान विकास,अध्यात्म व विकास,कवी संमेलन याबाबत तज्ञांनी मार्गदर्शन केले.राष्ट्रीय एकात्मता,पर्यावरण जागृती,ग्रामस्वच्छता,मतदानाच्या हक्काविषयी जनजागृती केली,बेटी बचाओ बेटी पढाओ,जलसाक्षरता,अंधश्रद्धानिर्मूलन इत्यादी. तसेच मंदिर व शाळा परिसरात वृक्षारोपण व संवर्धन केले.यापुढील कोरोनाच्या काळात कोरोना विषयी जनजागृती केली,त्याचबरोबर मास्क,सॅनिटायझर, मोफत धान्य वाटप,आर्सेनिक गोळ्यांचे वाटप,संतूर व डेटॉल साबणचे व हँडवॉश वाटप,इत्यादी वस्तूंचे वाटप केले, बचत गटाविषयी जनजागृती,लसीकरण मोहीमेत सक्रिय सहभाग,आभा कार्ड विषयी जनजागृती इत्यादी कार्य केले.त्यापुढील काळात पुन्हा गांधी महाविद्यालयाचा वटनवाडी या गावात सात दिवस कॅम्प घेऊन त्यामध्ये विविध कार्य केले.तसेच पुढील काळात मौजे देवी–निमगाव येथे कॅम्पमध्ये प्लास्टिक मुक्ती मोहीम, ग्राम स्वच्छता,मतदानाविषयी जनजागृती,हिमोग्लोबिन व रक्तगट तपासणी केली.त्याचबरोबर वडणवाडी येथे मुख्यमंत्री लाडकी बहिणी योजनेचा कॅम घेऊन ५१ महिलांचे मोफत फॉर्म भरून दिले,साक्षरता विषय जनजागृती,रेशन विषयक जनजागृती,सामाजिक क्य वाढवणे इत्यादी कार्य केले.या सर्व कार्याची दखल घेऊन त्यांना वॅक बुक ऑफ रेकॉर्ड कडून विविध क्षेत्रातील पुरस्कार जाहिर करण्यात आले



होते.त्यामध्ये वर्ष २०२५ किरण शिनगीरे यांना इंटरनॅशनल आयकॉन अवॉर्ड या आंतरराष्ट्रीय पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.तसेच त्यांना यापूर्वीही राज्यस्तरीय कोरोना योद्धा पुरस्काराने जि.अकोला, राज्यस्तरीय आदर्श युवा महाराष्ट्र युथ आयडॉल समाज रत्न पुरस्कार नाशिक,राज्यस्तरीय यशवंत रत्न पुरस्कार बीड,राष्ट्रीय नॅशनल आयकॉन पुरस्काराने दिल्ली येथे सन्मानित करण्यात आलेले आहे. या मिळालेल्या पुरस्काराबद्दल त्यांचे आमदार सुरेश अण्णा धस,प्राजक्ताताई धस,सागर धस,भगवानराव शिनगीरे,बीड जिल्हा ग्रंथालय अधिकारी संजय मस्के, संस्थाचालक वैजिनाथ निर्मळ,अमोलक जैन विद्या प्रसारक मंडळाचे अध्यक्ष योगेश भंडारी,कार्याध्यक्ष कांतिलालजी चानोदिया,सचिव हेमंत पोखरना, कोषाध्यक्ष डॉ.उमेश गांधी,डॉ.महेंद्र पटवा, माजी शिक्षणाधिकारी विक्रम पोकळे,झुंजारनेताचे उपसंपादक उत्तम बोडखे,कडा कृषी उत्पन्न बाजार समितीचे संचालक रामशेठ मधुरकर,सरपंच सतीशशेठ धस,पत्रकार रामदास जाधव,गांधी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.जवाहरलाल भंडारी, माजी प्राचार्य डॉ.नंदकुमार राठी, प्राचार्य बनाळे सर,राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रम अधिकारी डॉ.राजकुमार थोरवे, प्रा.डॉ.नवनाथ विधाते, प्रा.डॉ.नरेंद्र गवळी , प्रा.डॉ.सोमनाथ हासे, प्रा.डॉ.शिवाजी जगदाळे, प्रा.डॉ.शिवराज पातळे, प्रा.डॉ. तुकाराम गोंदकर, डॉ.जमीर सय्यद,जाधव सर, केदार सर, आडकर सर, मिसाळ सर,बोडखे सर,अरुणा कुलकर्णी मॅडम,धनश्री मुनोत मॅडम मॅडम,मीरा नाथ मॅडम,पूजा बोरा मॅडम सह आदी प्राध्यापक,पत्रकार अविनाश कदम,पत्रकार प्रवीण पोकळे,पत्रकार अण्णासाहेब साबळे,अक्षय विधाते ,समीर शेख,अहिल्यानगरच्या जिजाऊ ब्रिगेडच्या जिल्हा अध्यक्षा स्वाती जाधव,मा.सरपंच छगन शिनगिरे, सरपंच सागर दहातोंडे, उपसरपंच संतोष मुटकुळे,बाळासाहेब खकाळ ,विठ्ठल काकडे,राजू मुटकुळे,राम देशमुख,गोकुळ गावडे, असलम शेख,सौरव गुंड, जगदीश वनवे,सह विद्यार्थ्यांनी ,ग्रामस्थांनी व आष्टी तालुक्यातील विविध संघटनेने ही त्यांचे अभिनंदन केले.

# देगलूर तालुक्यात रेती अभावी घरकुलाचे बांधकाम ठप्प रेती घाट चालू करा-घरकुल लाभार्थ्यांची मागणी

लोकनेता न्यूज नेटवर्क

**देगलूर । जयपाल दावनगीरकर**

देगलूर पंचायत समिती अंतर्गत ग्रामीण भागात असलेल्या घरकुल लाभार्थी प्रवर्गातील खुला, अनु.जाती, अनु. जमाती आणि इतर मागासवर्गातील लाभार्थ्यांच्या कुटुंबाचे राहणीमान उंचावे म्हणून त्यांचा निवाऱ्याचा प्रश्न सुटावा यासाठी ग्रामीण भागामध्ये त्यांच्या स्वतःच्या जागेवर अथवा कच्च्या घराच्या ठिकाणी पक्के घर बांधुन देणारी घरकुल योजना शासनाने दिनांक १५ नोव्हेंबर २००८ पासून सुरू केली आहे.

त्या अनुषंगाने रमाई आवास योजना, शबरी आवास योजना, मोदी आवास योजना, जनमन आवास योजना सुरूवात करण्यात आली परवाच २०२५ मध्ये ग्रामीण भागातील लाभार्थ्यांना घरकुलाचा लाभ मिळावा हा उद्देश डोळ्यासमोर ठेवून प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी प्रधानमंत्री आवास योजनेतून ११,१,१६ ( अकरा हजार, एकशे, सोळा ) घरकुल मंजूर झाले आहेत त्यापैकी ९००० ( नऊ हजार च्या ) वर घरकुल लाभार्थ्यांच्या खात्यात १५००० ( पंधरा हजार ) रुपयांचा पहिला हप्ता जमा झाला परंतु घरकुलाचे बांधकाम करण्यासाठी राज्य सरकारकडून रेती उपलब्ध होत नसल्याने घरकुल लाभार्थ्यांचे स्वप्न अद्यापही पूर्ण होऊ शकत नाही. त्यामुळे प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांचे सर्वांसाठी घर या योजनेचे स्वप्न भंगणार की काय ? असा प्रश्न निर्माण होत आहे.

तालुक्यात एकूण ११,१,१६ घरकुल मंजूर झाले आहे. तत्कालीन अर्धवट राहिलेल्या घरकुल अंदाजे जवळपास चारशे ते पाचशे असे एकूण २००० घरकुल लाभार्थ्यांना बेसमेंट, गिलावा आदी बांधकामासाठी रेती उपलब्ध होत नसल्यामुळे घरकुल बांधकाम ठप्प झाले आहेत. देगलूर तालुक्यात चार ठिकाणी रेती घाट असून एकही



रेती घाट सुरू नसल्याने घरकुलासाठी रेती आणायची तरी कुठून? असा प्रश्न लाभार्थ्यांसमोर निर्माण झाला आहे.शासनाने घरकुल लाभार्थ्यांना घर बांधकाम करण्यासाठी प्रति पाच ब्रास रेती देण्याचा निर्णय शासनाने घेतला होता या निर्णयानुसार जिल्हा प्रशासनाने तालुक्यातील घाट राखीव ठेवले होते पण मागील दोन महिन्यापासून रेती घाट चालू नसल्याने ऑनलाइन केलेल्या लोकांना याचा नाहक त्रास सहन करावा लागत आहे आणि लाभार्थी या योजनेपासून वंचित राहत आहेत. लोकांना थोड्या पैशातून रेती मिळत नाही चोरीची रेती परवडतच नाही याचे दर तर गगनाला भिडले आहे. काही घरकुल लाभार्थ्यांनी तर गरीबांची रेती म्हणून क्रेशरचा ढस बांधकामासाठी वापर करत आहेत तर काहीनी चिंता व्यक्त केली जात आहे. त्यामुळे अनेक लाभार्थ्यांचे घर बांधकाम ठप्प झालेले आहेत. अनेकांचे स्वप्न अधुरे आपले स्वतःचे घर असावे असे प्रत्येकाचे स्वप्न असते यासाठी प्रत्येक जण धडपड करीत असतो. अनेक वेळा इकडून - तिकडून पैसा तसेच इतर साहित्य जमा करतो मात्र घर मंजूर असतानाही रेती अभावी अडल्याने या लाभार्थ्यां समोर मोठा प्रश्न उभा टाकला आहे, त्यामुळे जिल्हा व तालुका प्रशासनाने तालुक्यातील सांगवी (उमर), शेळगाव, शेवाळा आणि शेकापूर या ठिकाणच्या रेती घाटात अमाप लाल रेती आहे. या ठिकाणच्या चार गावापैकी एका गावातील ठिकाणच्या रेती घाटातील ऑनलाईन केलेल्या घरकुल लाभार्थ्यांसाठीच रेती घाट तात्काळ आरक्षीत पर्याय व्यवस्था करून देण्याची मागणी तालुक्यातील घरकुल योजनेच्या लाभार्थ्यांकडून केली जात आहे.

# मच्छिंद्रनाथ देवस्थानच्या संजीवन समाधी महोत्सवाचे २९ आणि ३० मार्च रोजी आयोजन

लोकनेता न्यूज नेटवर्क

**आष्टी । अण्णासाहेब साबळे**


बीड,नगरसह महाराष्ट्रातील अनेक भाविकांचे श्रद्धास्थान असलेल्या आष्टी तालुक्यातील सावरगाव नजीकच्या मच्छिंद्रनाथ देवस्थान 'मायंबा' समाधी महोत्सवाचे २९ आणि ३० मार्च रोजी आयोजन करण्यात आले आहे.

गर्भगिरीच्या पर्वत रांगेतील आष्टी आणि पाथर्डी तालुक्याच्या हद्दीवर मच्छिंद्रनाथ मायंबा हे देवस्थान आहे. या ठिकाणी राज्यभरातून भाविक दर्शनासाठी येत असतात.दरवर्षी गुढीपाडव्याला येथे मोठी यात्रा भरते . त्याच्या आधी संजीवन समाधी महोत्सवामध्ये विविध उपक्रमास सुरुवात होते.यावर्षी मंगळवार दिनांक २५ मार्चपासून हा महोत्सव सुरू होत असून या दिवशी निशाण दिंडीचे मच्छिंद्रनाथ गडाहून पैठण कडे प्रस्थान होईल.२९ मार्च रोजी पैठण येथे निशान मिरवणूक होईल.तेथून कावडीसह गडाकडे भाविक प्रस्थान करतील.२९ मार्च रोजी निशान आणि कावडीचे मच्छिंद्रगड येथे आगमन होईल.आधी महाआरती होईल त्यानंतर दुपारी दीड ते सायंकाळी चार या वेळेत विविध ठिकाणाहून कावडीने आणलेल्या गंगाजलाने समाधीस अभिषेक केला जाईल.सायंकाळी चार ते पहाटे साडेपाच या वेळेत समाधीस उटणे, चंदन लेप लावणे हा कार्यक्रम पार पडेल.मागील वर्षी मोठ्या प्रमाणात गर्दी झाल्याने रात्री बारा ऐवजी हा चंदन लेप लावण्याचा कार्यक्रमाची वेळ सायंकाळी चार पासून वाढवण्यात आली आहे.त्यानंतर रविवार दिनांक ३० मार्च रोजी पहाटे साडेपाच वाजता समाधीची विधीवत महापूजा केले जाईल त्यानंतर आरती होईल आणि नियमित दर्शन सुरू होईल अशी माहिती मच्छिंद्रनाथ देवस्थानच्या वतीने देण्यात आली आहे.




> **" आष्टी तालुक्यातील सावरगाव येथे संपूर्ण जगामध्ये एकमेव अशी मच्छिंद्रनाथांची एकमेव संजीवन समाधी असून गेल्यावर्षी दर्शन रांगेमध्ये प्रचंड अडचणी आल्या होत्या.काही त्रुटी राहिल्या होत्या.त्या त्रुटी यावर्षी आम्ही सर्व सुधारल्या आहेत.आजपर्यंत सायंकाळी सात वाजता समाधी उघडी करून दर्शन सुरू होत होते मात्र यावर्षी सकाळी दहा वाजता कावडी येतील .दुपारी साडेबारा वाजता आरती होईल.एक वाजेपर्यंत उटणे काढणे कार्यक्रम.दुपारी एक ते चार कावडीने आणलेले पाणी घालणे.व चार वाजता उटणे (लेप)लावणे कार्यक्रम सुरू होणार असून दुसऱ्या दिवशी पहाटे पाच वाजेपर्यंत समाधी दर्शन सुरू राहील हा बदल वाढत्या गर्दीमुळे करण्यात आला आहे.**
> **आ.सुरेश धस आष्टी विधानसभा**

# उमरी राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीच्या वतीने तळेगावात इफ्तार पार्टी आयोजन



लोकनेता न्यूज नेटवर्क

**उमरी । महेश पडोळे**

मुस्लिम धर्मीयात महत्वापूर्ण मानल्या जाणाऱ्या ईद या साननिमित्त देशात सर्वत्र मुस्लिम बांधवाचे रोझे चालू आहेत या पवित्र सणात हिंदू धर्मीय बांधव वेगवेगळ्या पद्धतीने मुस्लिम बांधवा सोबत सहभागी होऊन प्रेम बंधुत्वाची भावना निर्माण करतात दर वर्षी प्रमाणे तळेगावातील जमामस्जिद येथे राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे प्रदेश सरचिटणीस डॉ विक्रम देशमुख यांच्या वतीने इफ्तार पार्टी चे आयोजन करण्यात आले या वेळी मस्जिद चें मौलाना मुफ्ती सोहेल साहब, हाजी मोगल चंदपाशा पटेल, माजी उपसरपंच मैनूला बेग, हाजी शेख ताजोद्दीन, माजी सरपंच रामराव रेड्डी, मोगल खायाज बेग पटेल,माजी सरपंच गंगाधर शिगळे,मोगल मुसा बेग,शेख बाहोद्दीन एस. के. मोगल सज्ञात पटेल, शेख अलीमोद्दीनसाहब,मोगल मुस्ताक बेग, मोगल अन्नू मिस्त्री, शेख नावाज, मोगल मुझम्मील पटेल, मोगल अकबर बेग, माजी उपसरपंच, समीर शेख, सिकंदर पटेल, जब्बार पटेल,ईशाक पटेल, मिया भाई, व अनेक मुस्लिम रोजेदार उपस्थित होते.

# उमरीत मटकाकिंगसह दोघावर गुन्हा दाखल!

लोकनेता न्यूज नेटवर्क

**उमरी । किशनराव गायकवाड**

उमरी शहरातील नगरपालिके जवळ पोलिसांच्या पथकाने छापा टाकून जुगार खेळणारे व खेळविणा-या दोन अट्टल गुन्हेगारांना अटक केली.याबाबत त्यांच्या विरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.सदरील घटना सोमवारी दि २४ मार्च रोजी रात्री अकरा वाजता घडली.पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार,मटका चालक जलिल जिलानी शेख, मेन मटका किंग मालक निजाम तांबोळी हे दोन जुगारी उमरी नगर पालिके जवळ जुगार खेळताना व खेळवितांना आढळून आले.साहयक पोलिस निरीक्षक



सचिन आरमाळ यांनी व त्यांच्या पथकाने छापा टाकून रोख ६०० मरूपमये व जुगाराचे साहित्य जप्त केले.दोन्ही आरोपी विरूद्ध उमरी पोलिस ठाण्यात महाराष्ट्र जुगार प्रतिबिंबक कायदा अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे.उमरी बिट अंमलदार रमन गेडाम अधिक तपास करीत आहेत.

# राजर्षी शाहू महाविद्यालयात लोकमत ग्लोबल अवॉर्ड मिळाल्याबद्दव डॉ.सुगदेव मांटे व रेवती मांटे यांचा सत्कार

लोकनेता न्यूज नेटवर्क

**पारध । रमेश जाधव**

लोकमत समूहाच्या वतीने देण्यात येणारा शिक्षण व सामाजिक क्षेत्रामध्ये उल्लेखनीय कामगिरी केल्याबद्दल लोकमत ग्लोबल पुरस्कार यावर्षी भिलदरी बहुउद्देशीय संस्थेला देण्यात आला. संस्थेचे संस्थापक सचिव प्रो. डॉ. सुखदेव मांटे व अध्यक्षा रेवती ताई मांटे, मिताली मांटे यांचा हॉंगकॉंग येथे प्रसिद्ध अभिनेते सोनू सूद यांच्या हस्ते सन्मान करण्यात आला. त्यानिमित् महाविद्यालयात
मांटे परिवाराचा मानसन्मान करण्यात आला. यावेळी संस्थेच्या सर्व शाखांच्या वतीने हा सत्कार करण्यात आला कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. राजाराम डोईफोडे व प्रमुख पाहुणे म्हणून अधीक्षक किशोर वाघ, श्री. संतोष पालवे यांची उपस्थिती होती. संस्थेच्या वतीने विश्वास लोखंडे, संजय तबडे, वैभव भोरकडे, विठ्ठल बोडखे, अधिकार पाटील, राहुल सुरडकर, कृष्णा अल्हाट, तुकाराम लोखंडे, भागवत पानपाटील, गजानन लोखंडे यांच्या हस्ते हागकॉंग येथे झालेल्या सत्काराच्या छायाचित्राची प्रत देऊन मान सन्मान केला. त्यानंतर पाराशर ऋषी इंग्लिश स्कूलच्या प्राचार्य साधना टेकाळे यांच्या हस्ते संस्थेच्या अध्यक्षा रेवतीताई मांटे यांचा मान सन्मान केला करण्यात आला यानंतर राजर्षी शाहू महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. राजाराम डोईफोडे, उपप्राचार्य अमोल बांडगे,



यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाचे केंद्र संयोजक प्रा. धनराज भोसले, मुख्याध्यापक विलास लोखंडे यांच्या नेतृत्वात आपापल्या विभागाच्या वतीने हा मान सन्मान करण्यात आला. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. अनिल मगर यांनी केले तर आभार विलास लोखंडे यांनी मानले. यावेळी शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. महाविद्यालयाच्या वतीने प्रा. रवींद्र पानपाटील, प्रा. किसन वाघ, प्रा. रामेश्वर पाडळे, प्रा. राहुल शिरसाठ, प्रा लक्ष्मण सुसर तर कनिष्ठ महाविद्यालयाच्या वतीने प्रा.लक्ष्मण खरात, प्रा दिनेश कापरे, प्रा. राजू धनवई, प्रा. मंगेश लोखंडे, प्रा. जाधव तर विद्यालयाच्या वतीने श्री. ज्ञानेश्वर अल्हाट, उपमुख्याध्यापक विवेक अवसरमोल, विवेक पऱ्हाड, स्वप्नील वाघ, निलेश लोखंडे यांच्यासह इंग्लिश स्कूलच्या वतीने कासाबाई सपकाळ, ज्योतीताई लोखंडे, मनीषा वाघ, लता अवसरमोल, निकिता देशमुख, रुपाली बोराडे यांनी सत्कार केला. सत्काराला उत्तर देताना प्रो. सुगदेव मांटे यांनी आपला जीवन प्रवास विद्यार्थ्यांसमोर मांडून प्रतिकूल परिस्थितीमध्ये अनुकल कसे राहावे व ध्येय प्राप्त कसे करावे याबद्दल मार्गदर्शन केले.

# ग्रंथालयाचे महत्त्व समाजाच्या सर्वांगीण विकासासाठी अनन्यसाधारण!

लोकनेता न्यूज नेटवर्क


**आष्टी । अण्णासाहेब साबळे**

ग्रंथालये समाजातील एक अत्यंत महत्त्वपूर्ण संस्था आहेत.यांचे महत्त्व केवळ पुस्तकांच्या संकलनापुरतेच मर्यादित नाही,तर त्या शैक्षणिक,सांस्कृतिक,सामाजिक आणि मानसिक विकासासाठीही अत्यंत महत्त्वाच्या ठरतात.एखाद्या देशाच्या विकासासाठी,समाजाच्या शालेय आणि सामाजिक रचनांसाठी,तसेच व्यक्तिमत्व विकासासाठी ग्रंथालये अत्यंत आवश्यक असतात.खाली दिलेल्या बिंदूवरून आपण ग्रंथालयाचे महत्त्व समजू शकतो.

शैक्षणिक विकास : ग्रंथालयांचे मुख्य कार्य शैक्षणिक संसाधन पुरवणे आहे. विद्यार्थ्यांना,शिक्षकांना आणि शोधनिर्भर व्यक्तींना ज्ञान मिळवण्यासाठी ग्रंथालय एक महत्त्वाचे साधन ठरते.विद्यार्थ्यांसाठी विविध शालेय अभ्यासक्रमाचे पुस्तक, संदर्भ पुस्तकं,शोधनिबंध,जर्नल्स आणि इतर शैक्षणिक सामग्री उपलब्ध करून देणे,यामुळे त्यांचा अभ्यास अधिक प्रभावी होतो.ग्रंथालयात पुस्तके आणि संदर्भ साहित्य त्यांना अधिक माहिती मिळवण्याची आणि त्यांचे ज्ञान विस्तृत करण्याची संधी देतात.

वाचनाची संस्कृती: ग्रंथालये वाचनाच्या संस्कृतीला चालना देतात. वाचनाचे महत्त्व मांडणारे ग्रंथालय अनेक वाचन कार्यशाळा,प्रेरणा सत्रे आयोजित करतात,ज्यामुळे वाचनाची आवड वाढवता येते.लोकांना वाचनाची आवड लागली की,ते अधिकाधिक ज्ञान प्राप्त करतात,त्यांचे विचार शुद्ध होतात आणि ते व्यक्तिमत्वाने समृद्ध होतात.यामुळे एक सशक्त समाज निर्माण होतो.

सामाजिक समता: ग्रंथालये सार्वजनिक ठिकाणी असतात आणि सर्व लोकांसाठी खुले असतात. गरीब, अनुसूचित जाती-जमातीतील लोक, वृद्ध व्यक्ती आणि इतर सर्व वयोगटातील लोक हे एकाच ठिकाणी येऊन एकाच संसाधनाचा वापर करू शकतात.त्यामध्ये उच्च आणि निम्न वर्गाची कोणतीही भेदभाव नाही. यामुळे सामाजिक समता साधता येते, आणि प्रत्येक व्यक्तीसाठी समान शैक्षणिक आणि सांस्कृतिक संधी उपलब्ध होतात.सांस्कृतिक आणि वैचारिक आदान-प्रदान: ग्रंथालये केवळ शैक्षणिक साहित्य पुरवणाऱ्या स्थळांचा नसून,त्या सांस्कृतिक संवादाचे आणि




वैचारिक आदान-प्रदानाचे केंद्र बनतात.विविध जाती,धर्म,संस्कृती आणि विचारधारांचे साहित्य एकत्र करून त्या सामाजिक सुसंवादाला चालना देतात.विविध समुदायांतील लोक एकमेकांचे विचार वाचतात आणि त्यातून त्यांना विविधतांचा आदर करायला शिकता येतो. मानसिक आणि भावनिक विकास: वाचन हे केवळ शैक्षणिक उद्दिष्टासाठी नाही,तर ते मानसिक आणि भावनिक उन्नतीसाठी देखील महत्त्वाचे आहे.ग्रंथालये लोकांना विविध प्रकारच्या कथा,काव्य, विज्ञानकथा,इतिहास आणि इतर साहित्य उपलब्ध करून देतात, ज्यामुळे वाचकांना मानसिक समाधान मिळते आणि त्यांचा आंतरिक विकास होतो.वाचनामुळे लोकांची कल्पकता वाढते,त्यांचे विचार परिपक्व होतात आणि त्यांना मानसिक शांती मिळते.संदर्भ आणि संशोधनासाठी स्रोत:ग्रंथालये संदर्भ पुस्तकांचा आणि संशोधन साहित्याचा मुख्य स्रोत ठरतात.शाळांमध्ये, महाविद्यालयांमध्ये आणि संशोधन संस्थांमध्ये ग्रंथालयांचे महत्त्व अनन्य आहे.इथे विद्यार्थी आणि संशोधक विविध संदर्भग्रंथ,शोधनिबंध आणि जर्नल्स वापरून आपले संशोधन करत असतात.आजकाल,डिजिटल ग्रंथालये आणि ऑनलाइन संदर्भ साहित्यामुळे हे काम अधिक सोपे झाले आहे. तंत्रज्ञानाचा वापर:आजच्या तंत्रज्ञानाच्या युगात,ग्रंथालये केवळ पारंपरिक पुस्तक संकलनापुरतेच मर्यादित नाहीत.त्या डिजिटल संसाधनांचा वापर करून, इंटरनेटवरील ऑनलाइन पुस्तके, ई-पुस्तके,शैक्षणिक सॉफ्टवेअर्स आणि अन्य तंत्रज्ञानाचा वापर करून माहिती पुरवतात.डिजिटल ग्रंथालये आणि इ-लायब्ररींचा वापर करून वाचन आणि शिक्षणाचा विस्तार होतो.ग्रंथालयाचे महत्त्व समाजाच्या सर्वांगीण विकासासाठी अनन्यसाधारण आहे.शैक्षणिक, सांस्कृतिक,सामाजिक,आणि मानसिक उन्नती यांसाठी ग्रंथालये अत्यंत उपयुक्त ठरतात.ती केवळ पुस्तकांचे भांडार नसून,व्यक्तिमत्व घडवण्यासाठी,वाचनाची गोडी वाढवण्यासाठी, आणि सामाजिक समतेसाठी महत्वपूर्ण आहेत. तंत्रज्ञानाच्या युगात डिजिटल ग्रंथालयांचा वापर करून अधिक माहिती मिळवणे सुलभ झाले आहे, आणि सांस्कृतिक धरोहर जतन करण्यासाठी ग्रंथालये महत्त्वाची भूमिका बजावतात.लेखक भगवान शिनगीरे अध्यक्ष विवेकानंद सार्वजनिक वाचनालय वटनवाडी यांनी ग्रंथालयाच्या या सर्व महत्त्वपूर्ण पैलूंचे स्पष्ट वर्णन केले आहे.

# परभणी बलात्कार प्रकरणी आरोपीला कठोर शासन करावे-जिल्हाध्यक्ष विजय रणखांब

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**नांदेड । प्रतिनिधी**

परभणी येथील समाजाच्या मुलीवर बलात्कार व अन्याय करणाऱ्या नराधमांस कठोर शासन करण्यात यावे अशी मागणी लसाकमचे जिल्हाध्यक्ष विजय रणखांब केली असुन नांदेड जिल्हा लसाकमने या घटनेचा निषेध केला आहे .राज्यात समाजावर मोठ्या प्रमाणात अन्याय होत असल्याने शासनाने या गंभीर बाबीकडे लक्ष देण्याची गरज असल्याचे मत लसाकमचे जिल्हाध्यक्ष विजय रणखांब यांनी व्यक्त केले आहे. यासाठी मुख्यमंत्र्यांना लवकरच लसाकम विविध मागण्याचे निवेदन देणार असल्याचे त्यांनी सांगितले.

.२३ मार्च रोजी लसाकमची बैठक नांदेड येथे लसाकमचे जिल्हाध्यक्ष विजय रणखांब यांचे अध्यक्षतेखाली घेण्यात आली .यावेळी मार्गदर्शक डॉक्टर नामदेवराव वाघमारे सर ,जिल्हा सचिव पी एम सूर्यवंशी कोषाध्यक्ष बालाजी गुंडले संघटक आकाश टोमके, जिल्हा सहसचिव शिवाजी मोरेसर, डॉक्टर मंगेश पोतंगलेसर ,ज्येष्ठ मार्गदर्शक तुकाराम हिंगडे, विश्वंभर हातागळे, नारायणराव कलाले, डॉक्टर एस जी भोसले ,एम के पाटोदे , चंद्रकांत भांडवले, बाळासाहेब लोंढे,व अन्य सभासद उपस्थित होते. या बैठकीत सामाजिक प्रश्नावर चर्चा करून दहा ठराव घेण्यात आले व ते सर्वानुमते मंजूर करण्यात आले. या बैठकीत भारतीय लहुजी सेनेचे सरसेनापती व्हीजी रेड्डी सर यांचे दुःखद निधन झाल्याबद्दल त्यांना भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण करण्यात आली. तसेच परभणी येथील मातंग समाजाच्या मुलीवर अत्याचार करण्यात आले त्या नराधमावर कठोर कारवाई करण्यात यावी असा ठराव घेण्यात आला. यावेळी बैठकीचे मार्गदर्शक डॉ नामदेवराव वाघमारे यांनी समाजातील कर्मचाऱ्यांनी दानशूरता दाखवून आपले योगदान समाजाप्रती दाखविले पाहिजे आणि नवीन समाजाची निर्मिती



करण्यासाठी सर्व कर्मचाऱ्यांनी लसाकमच्या माध्यमातून निधी उभारून वेळोवेळी होणाऱ्या आंदोलनाला व विविध कार्यक्रमाला हातभार लावण्यासाठी सहकार्य केले पाहिजे असे सांगून लसाकम ही वैचारिक चळवळ आहे, समाजासाठी काम करणारी संघटना असून त्यामध्ये सर्वांनी सामील होण्याचे आवाहन प्रा. डॉ. नामदेवराव वाघमारे सर यांनी केले आहे. यावेळी महिला प्रतिनिधी म्हणून दीपाताई पौळकर, सविताताई रणखांब ,चंदाताई नारायण पवार, जोशनाताई वरवंटकर यांची लसाकम जिल्हा कार्यकारणी पदावर महिला प्रतिनिधी म्हणून निवड करण्यात आली . अधिव्याख्याता वर्षाताई खांनजोडे यांची जिल्हा प्रवक्त्या म्हणून निवड करण्यात आली. तसेच डॉ.अण्णाभाऊ साठे यांना म्हणून तर भारतरत्न पुरस्कार देण्यात यावा यासाठी लसाकमच्या वतीने पत्रव्यवहार व मुख्यमंत्री महोदयांना निवेदन देण्याचे ठरले, डॉक्टर अण्णाभाऊ साठे यांचे मुंबई विद्यापीठाला नाव देण्यात यावे, मातंग समाजातील इच्छुक महिलांना संघटनेत समाविष्ट करून घेण्यात येण्याचे प्रयत्न करण्यात यावे, अण्णाभाऊ साठे विकास महामंडळाचे विना जामीनदार कर्ज वितरण समाजातील तरुणांना करण्यात यावे व जिल्ह्यातील सर्व तालुका कार्यकारिणीची निवड करण्यात यावी असे अनेक ठराव यावेळी घेण्यात आले सर्व ठराव सर्वानुमते मंजूर करण्यात आलेले आहेत. यावेळी डॉक्टर नामदेवराव वाघमारे सर जेष्ठ मार्गदर्शक तुकारामजी हिंगडे सर ,पी एम सूर्यवंशी, बालाजी गुंडले डॉक्टर एस जी भोसले, जिल्हाध्यक्ष विजय रणखांब यांनी समाजाच्या प्रश्नावर मार्गदर्शन केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन कोषाध्यक्ष बालाजी गुंडले तर आभार प्रदर्शन सहसचिव शिवाजी मोरे सर यांनी मानले.

# शिवसेना जिल्हाप्रमुखपदी ए.जे.बोराडे यांची नियुक्ती; कार्यकर्त्यांमध्ये जल्लोष

## शिवसेनेचे संघटन मजबूत करणार-ए जे बोराडे

**शिवसेनेचे मुख्य नेते, राज्याचे माजी मुख्यमंत्री तथा उपमुख्यमंत्री ना. एकनाथराव शिंदे यांनी जिल्हाप्रमुख पदाची जबाबदारी दिली असून या माध्यमातून जिल्ह्यात शिवसेनेचे संघटन मजबूत करणार असून सर्वसामान्य लोकांना न्याय मिळवून देण्यासाठी प्रयत्न करणार असल्याचे जिल्हाप्रमुख ए जे बोराडे यांनी सांगितले.**



■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**मंठा । प्रतिनिधी**

राज्याचे माजी मुख्यमंत्री तथा उपमुख्यमंत्री ना. एकनाथराव शिंदे यांनी शिवसेनेच्या जालना जिल्हा प्रमुखपदी ए. जे. बोराडे यांची नियुक्ती केल्याने मंठा, परतूर तालुक्यासह जिल्ह्यातील कार्यकर्त्यांनी फटाक्यांची आतिषबाजी करून जल्लोष व्यक्त केला. ना. शिंदे यांनी माजी मंत्री तथा आ. अर्जुनराव खोतकर, आ. हिकमतराव उढाण, शिवसेना सचिव संजय मोरे, उपनेते आनंद जाधव, संपर्कप्रमुख पंडितराव भुतेकर यांच्या उपस्थितीत ए जे बोराडे यांना जिल्हाप्रमुख पदाचे नियुक्तीपत्र दिले. श्री बोराडे यांनी आपल्या ३० ते ३५ वर्षाच्या सामाजिक आणि राजकीय कार्यकाळात समाजाभिमुख व लोकोपयोगी अनेक कामे केली. त्यांनी मोर्चे आणि आंदोलनाच्या माध्यमातून सर्वसामान्य शेतकऱ्यांना न्याय मिळवून दिला. स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणुकासह त्यांनी बहुतांश ग्रामपंचायतीवर कार्यकर्त्यांना संधी दिली. ए. जे. बोराडे यांनी यापूर्वी उबाठा गटाचे जिल्हाप्रमुख म्हणून १६ वर्षे जबाबदारी सांभाळली. उपमुख्यमंत्री ना. एकनाथराव शिंदे यांनी जालना येथे झालेल्या प्रवेश सोहळ्यात ए जे बोराडे यांच्या कामाचे कौतुक केले होते. त्यांच्यावर जिल्हाप्रमुख पदाची जबाबदारी दिल्यानंतर आता कार्यकर्त्यांनी फटाक्यांची आतिषबाजी करून जल्लोष केला. त्यांच्या नियुक्तीने कार्यकर्त्यांमध्ये उत्साहाचे वातावरण निर्माण झाले आहे. आज रविवार ता. २३ रोजी मंठा येथे आगमन होताच बाजार समितीच्या आवारात त्यांचे जंगी स्वागत करण्यात आले.

# सीबिल स्कोअरच्या आधारावर पीककर्ज नाकारता येणार नाही

## शेतकऱ्यांसाठी मोठा दिलासा!

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**मालेगाव । संदीप कदम**

शेतकऱ्यांना पीककर्ज नामंजूर करताना त्यांच्या सिबील स्कोअरचा आधार घेता येणार नाही. बँकांनी कर्जमंजूर करताना सीबिल स्कोअर विचारात घ्यावा. मात्र, त्याच्या आडून शेतकऱ्यांना पीककर्ज नाकारू नये, असे लेखी उत्तर केंद्रीयमंत्री निर्मला सीतारामन यांनी लोकसभेत खासदार ओमप्रकाश राजेनिंबाळकर यांनी मांडलेल्या प्रश्नाला दिले आहे. तसे आदेश बँकांना देत दोन लाखांपर्यंतच्या पीक कर्जासाठी बँकांना कोणतेही तारण मागता येणार नाही, असेही केंद्रीय मंत्र्यांनी बजावले आहे, अशी माहिती खासदार निंबाळकर यांनी दिली.

केंद्र सरकारने शेतकऱ्यांच्या आणि विद्यार्थ्यांच्या आर्थिक गरजांसंदर्भात महत्त्वपूर्ण निर्णय घेतले आहेत. लोकसभेत खासदार राजेनिंबाळकर यांनी तारांकित प्रश्न क्रमांक ३३१ नुसार पीककर्ज व शैक्षणिक कर्जासाठी शेतकरी व विद्यार्थ्यांना येणाऱ्या अडचणींकडे सभागृहाचे लक्ष वेधले. एक वर्षाच्या मुदतीवर तसेच पीक तारणावर दिल्या जाणाऱ्या पीक कर्जासाठी बँकांकडून विविध कारणे पुढे केली जात आहेत.कर्जासाठी नाठाळपणा दाखवताना बँकांकडून आता शेतकऱ्यांच्या सीबिल स्कोअरचाही आधार घेतला जात आहे. कमी स्कोअर असलेल्या शेतकऱ्यांना बँकांकडून पीककर्ज नामंजूर केले जात आहे. कर्जासाठी तारणही घेण्यात आहे, असे निंबाळकर यांनी निदर्शनास आणून दिले. त्याची दखल केंद्रीयमंत्री सीतारामन यांनी घेत बँकांनी कर्जवाटपाच्या प्रक्रियेत कर्ज माहिती कंपन्यांचा अहवाल अर्थात सीबिल स्कोअर विचारात घ्यावा, मात्र केवळ त्याचाच आधारावर कर्ज नाकारू नये.तसेच, शेतकऱ्यांसाठी दोन लाख रुपयांपर्यंतच्या पीक कर्जांवर कोणतीही तारण मागितली जाणार नाही, असे स्पष्ट केले. यासोबत तीन लाख रुपयांपर्यंतच्या पीककर्जासाठी कोणतेही प्रोसेसिंग फी, प्रलेखन शुल्क किंवा इतर सेवा शुल्क आकारले जाणार नाही, असेही त्यांनी जाहीर केले. यामुळे शेतकऱ्यांना पीककर्ज मिळणे सुलभ होणार आहे. त्यांना त्यासाठी जास्त खर्च येणार नाही, असेही खासदार निंबाळकर यांनी सांगितले.

**साडेसात लाखांचे शिक्षण कर्ज विनातारण**


बँकांकडून शैक्षणिक कर्ज मंजूर करताना मालमत्ता व अन्य तारण मागण्यात येते. त्यावर केंद्र सरकारने साडेसात लाख रुपयांपर्यंतच्या शैक्षणिक कर्जासाठी कोणत्याही प्रकारच्या तारणाची आवश्यकता नसल्याचे स्पष्ट केले आहे. भारत सरकारच्या शिक्षण कर्जासाठी पतहमी निधी योजनेअंतर्गत (सीजीएफएसईएल) अंतर्गत शैक्षणिक कर्ज हमीदाराशिवाय मंजूर केली जाणार असल्याचेही खासदार निंबाळकर यांच्या प्रश्नाला उत्तर देताना सीतारामन यांनी म्हटले आहे.यासोबत पीएम विद्यालक्ष्मी योजनेतून देशभरातील ८६० उच्च शिक्षण संस्थांमध्ये प्रवेश घेणाऱ्या गुणवंत विद्यार्थ्यांना सहज आणि पारदर्शी पद्धतीने कर्ज मिळणार आहे. यामुळे विद्यार्थ्यांना मोठा आधार मिळेल, असे निंबाळकर यांनी सांगितले.

# २८ रोजी शिऊर येथे हजरत पीर याकूब साहेब उर्स होणार साजरा

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**निलंगा । इस्माईल महेबूब शेख**

मौजे शिऊर येथे दरवर्षी प्रमाणे या वर्षी ही हजरत पिर याकूब साहेब उर्स मोठ्या उत्साहात साजरा होणार आहे. हजरत पिर याकूब साहेब उर्स चे वेगळेच महत्व मानले जाते ते असे की, मांजरा नदीच्या काठावर वसलेले शिऊर गाव, मांजरा नदीच्या तुडुंब भरलेल्या पाण्याचे एक वेगळेच सौदर्य आहे, आणि याच नदीच्या काठावर वसलेले हजरत पिर याकूब साहेब दरगाह. या दरगाह च्या एका बाजूला पाण्याने भरलेले नदीचे पात्र आणि चिंचेची हिरवीगार झाडे यामुळे याला वेगळीच शोभा आहे. प्रत्येक वर्षी गावातील हजारो भक्त या ठिकाणी येऊन हजरत पिर याकूब साहेब यांना साकडे घालतात, आणि ती साकडे पूर्ण ही करतात. उर्स साजरा होण्याच्या एक दिवस अगोदर या दिवशी पिरसाब चांदसाब मुल्ला मुक्काम पोस्ट शिऊर तालुका निलंगा जिल्हा लातूर याच्या घरून २७/०३/२०२५ रोजी संदल वाजत गाजत हजरत पिर याकूब साहेब दरगाह या ठिकाणी घेऊन जातात. यात गावातील लहान थोर लोक वेगवेगळी नृत्य सादर करत आपल्याच आनंदात सहभागी होत असतात. दुसऱ्या दिवशी गावातील आणि बाहेर गावातील भक्त साकडे फेडण्यासाठी बकऱ्याचे तर काही भक्त गूळ खोबराचे नैवद्य घेऊन येतात. हा कार्यक्रम दिवस भर चालू असतो. या यात्रेच्या निमित्ताने दरगाह च्या बाजूला जत्रा सुद्धा भरते, या जत्रेत गावातील लहान मोठ्यांचा वेगळाच थाट पाहायला मिळतो. लहान मोठी खेळणे, वेगवेगळे




खाण्याचे पदार्थ, आणि जवळच्या भक्तांच्या घरचे जेवणाचे आमंत्रण यात गावातील प्रत्येक वेक्ती सहभागी होत असतो. बाहेर गावावरुन आलेले पाहुणे, गावातील लोकांचा आलेला जनसागर, दरगाह भरुन जातो. त्याच बरोबर संध्याकाळी वेगवेगळ्या कलाकारांचे प्रदर्शन साजरे केले जाते, यात कवाली चा कार्यक्रम खास करून लक्ष वेधून घेणारा असतो. आणि २९/०३/२०२५ रोजी या कार्यक्रमाचा चिराका हा कार्यक्रम केला जातो. एकंदरीत हा तीन दिवसांच्या कार्यक्रमात गावातील आणि बाहेर गावातील लोकांचा वेगळाच थाट वाहायला मिळतो.

# शासनाच्या विविध योजनांचा लाभ घेण्यासाठी शेतक-यांनी ॲग्रीस्टॅक नोंदणी करावी-गजानन शिंदे

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**बिलोली । गौतम गावंडे**

आपल्या शेतीच्या विकासासाठी आणि सरकारी योजनांचा सहज लाभ घेण्यासाठी शासनाने 'ॲग्रीस्टॅक' म्हणजेच शेतकरी ओळखपत्र क्रमांक देण्याची प्रक्रिया सुरू केली आहे. या क्रमांकामुळे आपल्या जमिनीची माहिती आधार क्रमांकाशी जोडली जाईल आणि शेतकऱ्यांसाठी असलेल्या विविध सरकारी योजनांचा लाभ सहज मिळणार आहे.त्यामुळे बिलोली तालुक्यातील शेतक-यांनी शासनाच्या विविध योजनांचा लाभ घेण्यासाठी लवकरात लवकर सी. एस. सी केंद्रावर जाऊन ॲग्रीस्टॅक नोंदणी करावी असे




आवाहन बिलोलीचे तहसीलदार गजानन शिंदे यांनी केले आहे.

शासनाच्या कृषीविषयक योजना अधिक पारदर्शक आणि जलद कार्यान्वित करण्यासाठी हे ओळखपत्र उपयुक्त ठरणार असून पीएम किसान सन्मान निधी दरवर्षी थेट बँक खात्यात जमा होण्यास मदत होईल. तसेच पीक विमा आणि कर्ज मंजुरी तातडीने प्रक्रिया, कृषी अनुदान, खत व बियाणे योजनेचा जलद लाभ मिळेल.हवामान अंदाज, आधुनिक शेती सल्ला आणि बाजारभाव माहिती,मृदा परीक्षण व खत सल्ला मिळेल. राज्य आणि केंद्र सरकारच्या सर्व कृषी योजनांमध्ये प्राधान्य मिळून नवीन कृषी तंत्रज्ञान, अवजारे आणि सिंचन योजना, शेततळे, ठिबक सिंचन, गटशेती योजनेतील लाभ,गटगटवारी नोंदणी व शेतकऱ्यांसाठी विशेष सवलती साठी ॲग्रीस्टॅक ओळखपत्र महत्वाचे ठरणार आहे.ॲग्रीस्टॅकच्या नोंदणीसाठी बिलोली तालुक्यातील सर्व शेतक-यांनी आधार कार्ड,आधारशी लिंक असलेला मोबाईल क्रमांक व ७/१२ उतारा (जमिनीचा दाखला) घेऊन ग्रामपंचायत कार्यालय, उडउ सेंटर (कॉमन सर्व्हिस सेंटर),आपले सरकार सेवा केंद्र,तलाठी कार्यालयात जाऊन लवकरात लवकर नोंदणी करून घ्यावी असे आवाहन तहसीलदार गजानन शिंदे यांनी केले आहे.

# सात वर्षाच्या सय्यद तहेरीनने ठेवली पहीला रोजा

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**कंधार धोंडीबा मुंडे**

मुस्लिम बांधवासाठी पवित्र असलेला रमजान महिना सध्या सुरु आहे.रमजान महिन्यात मुस्लिम बांधव रोजा म्हणजे उपवास ठेवतात. मुस्लिम धर्मात रोजा ला अनन्य साधारण महत्व आहे. या रखरखत्या उन्हात कंधार शहरातील ७ वर्षीय तहेरिन सय्यद सादात चिमुकलीने आपल्या जिवनातील पहिला रोजा धरला आहे. कंधार शहरातील प्रसिद्ध व्यापारी सय्यद इसाक यांची ती नात आहे.

मन आणि शरीर शुद्ध करण्याचा तो एक मार्ग आहे. आजच्या या कठीण काळातही माणसाला निरोगी आणि चिंतामुक्त ठेवण्याचे काम रोजा करतो. रोजा असणारा व्यक्ती दिवसभर काहीही खात किंवा पाणी सुद्धा पीत नाही.सध्या उन्हाळा सुरु असल्याने रोजा धरणे कठीण समजले जाते मात्र कंधार येथील पत्तरकार नगर येथील तहेरिन या फक्त ७ वर्षाच्या चिमुकली ने रोजा धरल्याने ती चर्चेचा विषय ठरली आहे.



मुस्लिम समाजाचा पवित्र असा रमजान महिना मानला जातो.या महिन्यात सर्व मुस्लिम मंडळी रमजान चे उपवास म्हणजेच रोजे ठेवत असतात. परंतु इतक्या उन्हाळ्यात ३४ ते ३८ अंश तापमान असतांना उपवास पवित्र रमजान महिन्यात आपल्या जीवनाचा पहिला रोज़ा पूर्ण करून आपल्या जीवनातला पहिला रोज़ा ठेवला. सध्याचे तापमान आणि रखरखत्या उन्हाळ्यात पहाटे सकाळी ५ वाजेपासून ते सायंकाळी ६.३५ वाजेपर्यंत अन्नाच्या एक कण आणि पाणी च्या आधारावर उपाशी पोटी राहून हिने (अल्लाह) ईश्वर प्रती आपली श्रद्धा व्यक्त केली. एवढ्या कमी वयात आपल्या जीवनाचा पहिला रोज़ा पूर्ण केल्याबद्दल या चिमुकलीचे सर्वत्र अभिनंदन होत आहे. पत्रकार सय्यद हबीब यांची ती पुतनी आहे.

हे पत्रक,मालक,मुद्रक, प्रकाशक संपादक ज्ञानेश्वर भाऊसाहेब मुंढे यांनी न्यू गीता प्रिंटिंग प्रेस मिरकाळा ता गेवराई जि बीड ४३११२७ येथे छापून दैनिक लोकनेता कार्यालय हो.नं ५०,मेन रोड मिरकाळा ता गेवराई जि बीड ४३११२७ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले आहे. मो.नं ८४५९९७७९०४

This Newspaper is printed by owner, printer, publisher editor Dyaneshwar Bhausaheb Mundhe at New Geeta Printing Press Mirkala Ta Gevrai District Beed 431127 and published at Dainik Lokneta Office Ho.No. 50, Main Road Mirakala Ta Gevarai District Beed 431127 (Maharashtra) Mo no 84599 77904